# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/१०/२०२४ (शनिवार) सकाळ**

---

## अवैध्यरीत्या वाळु (रेती) गौणखनीज चोरीची वाहतुक करणाऱ्यांवर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २६/१०/२०२४ चे सकाळी ०४/१० वाजता दरम्यान पोलीस स्टेशन केळवद पथक यांनी नागपूर पांढुर्णा हायवे रोडवर पेट्रोलींग करीत असता सावळी मार्गे पांढुर्णा हायवे रोडवर १२ चक्का ट्रक क्र सि.जी–०७/सि. जी–८९३५ येतांना दिसला त्यास थांबवुन चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव मनमोहन देवराम गाडा वय ४० वर्ष रा पुरेर्णा जि. कोरबा छत्तीसगढ असे सांगितले वरून ट्रकची पाहणी केली असता त्याचे ट्रक मध्ये विनापरवाना ९ ब्रास रेती गौण खणीज अवैध्य विनापरवाना एक ब्रास रेती किंमती ६०००/–रू असा एकुण ५४०००/– रू ची रेती चोरून घेउन जातांना मिळाला असून त्यास अटक करण्यात आली आहे तसेच त्याचे जवळुन ९ ब्रास रेती किमती ५४०००/–रू. व १२ चक्का ट्रक सिजी –०७/सि.जी.८९३५ किंमती ४०,००,०००/– रु एकुण ४०५४०००/– रू जप्त करण्यात आला असुन गुन्हयाचा सखोल तपास सुरू आहे

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण श्री हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), मा. अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामिण श्री. रमेश धुमाळ, मा. सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उप विभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, सावनेर श्री. अनिल मस्के यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि अनिल राउत ठाणेदार पो.स्टे केळवद पो.हवा दिनेश काकडे, पोहवा मंगेश धारपुरे, नापोहवा रविन्द्र साठाणे पोलीस स्टेशन केळवद चा.पो.शि. राहुल खोरगडे यांनी केली आहे.



## सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळविणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

दिनांक २५/१०/२०२४ रोजी पोस्टे कन्हान येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, पोलीस ठाणे कन्हान हद्दीतील वार्ड नं ६ संताजी नगर कन्हान येथे आरोपी जीवन लक्ष्मण मुळे रा संताजी नगर कन्हान ता पारशिवनी कन्हान हा अवैधरीत्या लोकांकडुन फोनद्वारे सट्टापटीचे आकडे लिहुन जुगार खेळ खेळवत आहेत त्यावरून पोस्टे कन्हान येथील स्टाफने मिळालेल्या खबरेप्रमाणे जावुन धाड टाकली असता त्याठिकाणी **आरोपी नामे— जीवन लक्ष्मण मुळे रा संताजी नगर कन्हान ता पारशिवनी कन्हान** हा लोकांकडुन सट्टापट्टीचे आकडे लिहुन पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळताना मिळुन आला. आरोपींकडुन १) वही आकडेमोड लिहलेले कागद व कार्बन कागदावर के/२५ के असे लिहलेले व त्याखाली आकडे लिहलेले एकुण ०६ कागद किंमती ५०/—रू २) चिमटा असलेला पॅड किंमती २०/—रू ३) एक जुना कॅल्क्युलेटर किंमती ४००/—रू ४) एक स्टिलची स्केलपट्टी किंमती २०/—रू ५) काळी शाई असलेला पेन ५/— रू प्रमाणे १०/—रू लोकांकडुन फोनदवारे आकडे लिहुन वापरता असलेला मोबाईल सॅमसंग कंपनीचा galaxy A30 model imei एकुण किंमती ५०००/—रू अंगझडती मिळुन आलेले नगदी १०५०/— रू असा एकुण ६५५०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपी विरुद्ध कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. संतोष गायकवाड यांचे मार्गदर्शनात पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोनि राजेंद्र पाटील, सपोनि राहुल चव्हान व इतर स्टाफ यांनी केलेली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर